# महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

वैद्यकीय शिक्षण व संशोधन,शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत,चौथा मजला,सेंट जॉर्जेस रूग्णालय आवार, पी.डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.वेबसाईट: www.msbnpe.org ई-मेल- msbnpe@gmail.com ,मो. नं: ०२२ २२६११०१५

# MAHARASHTRA STATE BOARD OF NURSING AND PARAMEDICAL EDUCATION

Directorate of medical education and research, ४th floor, st.georges hospital campus, p.d'melo road, fort, mumbai-४०० ००१ website:www.msbnpe.org e-mail- msbnpe@gmail.com, mobile no- ०२२ २२६११०१५


क्र.मराशुवपशिमं/महाडीबीटी/संस्था/बँक खाते बदल/ 6874/२०२३ दिनांक- 19/01/२०२३

प्रति,

प्राचार्य / संस्थाप्रमुख,

सर्व मान्यता प्राप्त व संलग्नीत ए.एन.एम. व जी.एन.एम. संस्था.

**विषय :** संस्थांचे महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईनरित्या बदल करण्यात आलेले तपशिल मंजूर करणेबाबत.

उपरोक्त विषयान्वये सन २०१८-१९ पासून महाराष्ट्र राज्य शासनाच्या सर्व योजनांसाठी माहिती व तंत्रज्ञान विभाग मंत्रालय (डि.आय.टी.) यांचेकडून आपले सरकार महाडिबीटी पोर्टल बनविण्यात आले आहे. डि.बी.टी. अंतर्गत योजनांचा लाभ संस्था/विद्यार्थ्यांना पोर्टलमार्फत देण्यात येता. डि.बी.टी. पोर्टलवर संस्थाचा लाभ संस्थांना मिळण्यासाठी प्राचार्य यांच्याकडून संस्थेच्या प्रोफाईल लॉगिनमध्ये बँक खात्याची संपूर्ण माहिती भरण्यात येते. बँक खात्यामध्ये संबंधीत संस्थांची रक्कम डि.बी.टी. पोर्टलमार्फत संस्थांच्या खात्यात पाठविण्यात येते. तसेच बँक तपशिलमध्ये ऑनलाईनबाबत बदल करण्याचे अधिकार देखील संस्थांच्या प्राचार्यांना देण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळाअंतर्गत येणाऱ्या ज्या संस्थांकडून पुर्वीच्या बँक तपशिलात बदल करुन डि.बी.टी. पोर्टलवर नविन बँक खात्याचा तपशील भरण्यात आलेला आहे त्या बँक खात्याच्या तपशिलात मंजूर/नामंजूर करण्याचे अधिकार डि.बी.टी. कडून मंडळास ऑनलाईनरित्या देण्यात आलेले आहेत.

संस्थांना बँक खात्यामध्ये जर बदल करावयाचे असतील तर त्या संस्थांनी आपल्या लॉगीन आय डी चा वापर करुन डि.बी.टी. पोर्टलवर ऑनलाईनरित्या कॉलेजच्या नावे असलेल्या नविन बँक खात्याचा तपशिल भरण्यात यावा. सदर बँक खातेमंजूर करण्यासाठी संस्थांच्या लेटर हेडवर खालील तक्त्यात पुर्वीच्या खात्याचा तपशील व मंजूर/नामंजूर करण्यासाठी संस्थाकडून डि.बी.टी. पोर्टलवर ऑनलाईनरित्या बदल केलेल्या बँक खात्याचा तपशिल बदल करावयाच्या कारणासह व चालू शैक्षणिक वर्षाचे संलग्नता पत्र व १०० रुपयाच्या मुंद्राक कागदावर शपथपत्र मंडळास सादर करण्यात यावे. तसेच आवश्यक असले तरच बँक खात्यात बदल करण्यात यावा अनावश्यक कारणासह बँक खात्यात बदल करण्यात येवू नये. बँक खात्याचा तपशिल मंजूर/नामंजूर हे मंडळ स्तरावर करण्यात येईल.

### संस्थांच्या डि.बी.टी. पोर्टलवर पूर्वीच्या बँक खात्याचा तपशिल

| अ.क्र. | संस्थेचे नाव | बँकेचा खाते क्रं. | बँकेचे नाव | IFSC कोड |
|---|---|---|---|---|
| | | | | |

### मंजूरीसाठी संस्थाकडून डि.बी.टी. पोर्टलवर ऑनलाईनरित्या बदल केलेल्या बँक खात्याचा तपशिल

| अ.क्र. | संस्थेचे नाव | बँकेचा खाते क्रं. | बँकेचे नाव | IFSC कोड | पुर्वीच्या खात्यात बदल करण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

संचालक

महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

**टीप :** ऑनलाईनरित्या विनंती सादर करतेवेळी पीडीएफ मध्ये संस्थेच्या लेटर हेडवर वरील प्रमाणे माहिती व बदलण्यात आलेल्या खात्याचे पासबूक किंवा Cancel Cheque व चालू शैक्षणिक वर्षाचे संलग्नता पत्र.